**अभ्यासपूरक साहित्य**

**बी.ए.प्रथम वर्ष**

**सत्र पहिले**

# तहान

लेखक – सदानंद देशमुख

प्रा.डॉ.सदानंद देशमुख यांनी तहान ही कादंबरी १९९८ साली प्रकाशित झाली. या कादंबरीच्या एकुण (२०१२ पर्यंत) ६ आवृत्या निघाल्या. यावरुन या कादंबरीची लोकप्रियता लक्षात येते. ही कादंबरी लेखकाने शेतकऱ्यांच्या मुलांना समर्पित केली आहे. यावरुन लेखकाची शेतकरी – शेतजीवनाशी बांधिलकी आहे हे स्पष्ट होते. तहान ही ग्रामीण कादंबरी आहे. ग्रामीण जीवनाशी लेखकाची नाळ जुळलेली आहे.

तहान या कादंबरीच्या शिर्षकावरुनच या कादंबरीचा विषय प्रथमदर्शनीच वाचकांच्या लक्षात येतो. प्रा.सदानंद देशमुख म्हणतात त्याप्रमाणे स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष झाली तरी ग्रामीण भाग पाण्यापासून वंचित आहे. हजारो खेडयात पिण्याच्या पाण्याकरीता भटकंती करावी लागते. लेखक म्हणतात, पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळयाच्या सुरुवातीपासूनच बायका–माणस रात्रंदिवस रानोमाळ भटकतात. रात्रभर जागून कोरडे झालेले हातपंप मारुन घामात निथळून निघतात. तळ गाठलेल्या विहीरीतल्या डबक्यातून ओंजळ ओंजळ पाणी उपसून आणतात. पाण्यासाठी सैरावैरा होतात. हाच विषय प्रा.देशमुखानी तहान मध्ये अतिशय वास्तवपणे रेखाटला आहे.

प्रा.सदानंद देशमुख म्हणतात पाणी टंचाईच्या भयानक दिवसात केवळ मानवी जीवनच होरपळून निघत नाही तर या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक असणारे शेतात गुरे, ढोरे, पशुपक्षी व प्राणी या अभावग्रस्त परिस्थितीची फार मोठया प्रमाणात झळ पोहचते. म्हणून लेखकाने हे चित्रण या कादंबरीत अतिशय उत्कटतेने केले आहे.

**तहान या कादंबरीचे थोडकयात कथानक :**

तहान या कादंबरीत राघोजी शेवाले त्यांची बायको रामकोर, मुलगा बबन व मुलगी वर्षा हे कुटूंब आहे. राघोजीकडे शेती होती. बँकेचे कर्ज काढून त्यांनी विहीर खोदली, पण पाणी लागले नाही. बँकेचे कर्ज वाढत गेले. सार पिक कर्ज फेडण्यात जात असे. एवढया परिस्थितीत त्यांचे बैल धिप्पाड होते. राघोजी बैलाची खूप काळजी घेत होता. पंचक्रोशीत बैल राखण्यात प्रसिध्द होता. कादंबरीच्या सुरुवातीपासून बैलांपासून तर शेवटही बैलांच्या मृत्यूपर्यंतचा आहे. त्यामुळे या कादंबरीचे सहनायक मुरल्या–छबिल्या ही बैलांची जोडी आहे. असे म्हटल्यास वावगे ठरु नये. या कादंबरीच्या कथानकाच्या विशेषाचा विचार करु या.

**१) कथानकातील जिवंतपणा :** तहान ही कादंबरी वाचतांना ही कादंबरी न वाटता सत्य घटनेवरील कथा वाटायला लागते. राघोजी शेवाळे या माणसाचे स्वकथन वाटावे इतकी ही कादंबरी जिवंत वाटते. या कादंबरीतील कुठलाही प्रसंग काल्पनिक किंवा अतिरंजित वाटत नाही. पाणी समस्या हा या कादंबरीचा विषय आहे. लेखकाच्या कल्पकतेमुळे व लेखनशैलीमुळे ही कादंबरी वाचकाच्या मनाचा ठाव घेते. कादंबरी वाचतांना वाचकाच्या डोळ्यासमोर दृष्ये साकार होऊ लागतात. कादंबरीचा जिवतंपणा शेवटपर्यंत कायम राहतो.

**अ) वेगवान कथानक :** तहान या कांदबरीचा कालखंड हा जेमतेम चार महिन्याचा आहे. होळीच्या आधीपासून

ही कादंबरी सुरु होते. व उन्हाळा संपायच्या आधी ही कांदबरी समाप्त होते. ही कादंबरी अतिशय वेगवान आहे. या कादंबरीतील कथा वेगाने पुढे सरकते. एक एक प्रसंग या कादंबरीत येत जातात. आणि पुन्हा पाण्याच्या प्रश्नावर विषय येऊन जातो. ही कादंबरी कुठेही भरकटत नाही. पाल्हाळपण अजिबात नाही. या कादंबरीत अनेक पात्रांची गर्दी आहे. कादंबरीच्या कथानकाच्या ओघात ती ती पात्रे येऊन जातात. पण मुख्य नायक सहनायक यांच्या वर ही कादंबरी स्थिरावत जाते. ही कादंबरी वेगवान कथानकामुळे अतिशय आटोपशीर झालेली आहे.

**क) कादंबरीचा हेतू :** उन्हाळ्याच्या दिवसात दरवर्षी महाराष्ट्रात पाण्याची भीषण टंचाई असल्याचे आपण पाहतो. पाण्यासाठी ग्रामीण भागातल्या लोकांची वणवण भटकंती आपल्याला दिसते अलिकडे पाणी समस्या हीच महत्वाची समस्या आहे. ही समस्या कांदबरीत मांडतांना लेखकाचे कैाशल्य पणाला लागले आहे. केवळ राघोजी बबन यांची शाकांतिका या कादंबरीत दाखवणे हा लेखकाचा हेतू नाही. लेखक मनोगतात म्हणतात. त्याप्रमाणे ते हा विषय चार पाच वर्षापासून मांडण्यात गुतंले होते. या काळात त्यांनी ग्रामीण भागातील पाणी टचांईच्या आणि लोण्या लागलेल्या बुरुजासारख्या ढासळणाऱ्या, चुलीपुढे करपून जाणाऱ्या भाकरीसारखी ग्रामीण समाजव्यवस्थेच्या संदर्भात चिंतन केले. त्या चिंतनातून त्यांना जे गवसलं ते त्यांनी प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी साहित्यात अलिकडे ग्रामीण जीवनाचे चित्रण दिसत नाही. ही उणीव भरून काढणे हा देखील या कादंबरीचा हेतू आहे. शहरी लोकांना ग्रामीण जीवनातील समस्या दुःख याची जाणीव या कादंबरीमुळे नक्कीच होते. ग्रामीण जीवनाचे वास्तव समाजापुढे मांडणे हा देखील या कादंबरीचा हेतू आहे.

**२) व्यक्तीरेखेतील विविधता :** तहान या कादंबरीत मुख्य व्यक्तिरेखा राघोजी, बबन, रामकोर, या आहेत. तर दुय्यम व्यक्तिरेखामध्ये प्रमोद नवले, वर्षा, सतीश मंगळे, सोमनाथ हावरे, मोहन काळे, रत्ना, संपत देवकुळे, गोंविदा शेवाळे इत्यादींचे नाव घेता येईल. प्रत्येक व्यक्तिरेखा स्वभावदृष्टया भिन्न आहेत. शेतीवर आणि बैलावर जीव असलेला राघोजी, तहान–भूक विसरुन पाणी आणून विकणारा बबन, पाण्याच्या पैशामुळे नवऱ्याला सदा पाण्यात पाहणारी रामकोर, या तीन व्यक्तीरेखा या कादंबरीचे आधारस्थान आहेत. राघोजी आणि रामकोर यांच्या परस्परविरोधी व्यक्तिरेखा आहेत. राघोजी समंजस तर रामकोर शेफारलेली दिसते. तिचा पैसा हाच जीव का प्राण आहे.

**३) भाषाशैली :** या कादंबरीत भाषा वऱ्हाडी आहेत अर्थात बुलडाणा जिल्हयातील ही भाषा आहे. भाषेतील जिवंतपणा हा कादंबरीला लाभल्यामुळे कादंबरी ही अधिकच खुलून गेली आहे. ग्रामीण बोली आणि त्या बोलीचे विशेष लेखकाने अतिशय नेमकेपणाने हेरले आहे. शब्दाची मोडतोड करुन त्यांनी भाषाशैली फुलविली नाही तर ग्रामीण बोलीचा एक जो बाज आहे. तो शेवटपर्यत टिकवला आहे. कादंबरीचे अर्धे यश हे लेखकाच्या भाषाशैलीचा आहे. या कादंबरीतील वाक्ये पाहू या.

१) बैल म्हणजे माह्या काळजाचे तुकडे

२) माणसापेक्षा या जंगलात बरं वाटते इच्या मायले.

३) जिथी उजेडाची भिती, तिथीच लेकाचा दिवस उगवते.

४) त्यांच्या अंगावर हिरवा काटा आला.

५) जळत्या निखाऱ्यावर पाणी ओतावं तसा तो आतल्या आत गार झाला.

६) माणसांच मुंडक अन हात कापून घेतल्यावर जसा माणूस दिसल, तस आंब्याच्या झाडाचं खोडूक दिसाय लागलं.

**म्हणीचा वापर :** प्रा.सदानंद देशमुखांनी वऱ्हाडातल्या म्हणीचा पात्रांच्या तोंडी उपयोग केल्यामुळे ग्रामीण जीवनाचे अस्सल रुप वाचकांच्या समोर येते. पुष्कळ काही सांगण्यापेक्षा म्हणीचा वापर केला तर पुढच्या व्यक्तीला त्याचा मतितार्थ चटकन कळतो. ग्रामीण भागातील प्रचलीत म्हणीचा यथायोग्य वापर लेखकांनी केला आहे. विशेषतः रामकोर हिच्या बोलण्यातून खूप म्हणी येतात. तिचा स्वभाव आणि बोलण्याची ढब यामुळे म्हणी अगदी चपखल बसल्या आहेत. काही म्हणी पाहू या.

१) 'पाळायले ना पोसायले अन फुकट डोळे वासायले.'

२) 'सवळ दाट अन खाली फडा वर ताट'

३) 'वाकळीतले पाय साकळीत झाले.'

४) 'मानानं खाये ना तूप रोटी अन निजल्या निजल्या उखळ चाटी'

५) 'कामवाल्याने घम नाई अन रिकाम्याले दम नाई'

६) 'नांदा लावे अन कांदा चावे'

७) 'घरची म्हणते बयाबया अन् बाहेरचीले चोळी शिवा'

८. 'कशाचे काय अन फाटक्यात पाय.'

९) 'एका हातानं घाला, अन दोन्ही हातानं काढा.'

१०) 'ये घोरा अन बैस पाठकुळी.'

११) 'पुणं लुटूनं साताऱ्याले दान.'

१२) 'बाप तसा लेक, अन् उंबरठयाची ठेक.'

या म्हणीतील बहुतेक म्हणी रामकोरच्या बोलण्यातून प्रकटल्याआहेत. या म्हणीमुळे ग्रामीण भागातल्या बोलींची नजाकत वाचकांना जाणवते.

**५) उपकथानक :–** या कादंबरीमध्ये अनेक प्रसंग आहेत त्या प्रसंगाला अनुसरुन थोडे कथानक आले आहे. कादंबरीच्या ओघात हे प्रसंग येतात. पुन्हा कादंबरी मुळ विषयाकडे वळते. पण त्यात विषयातंर होत नाही हे महत्वाचे आहे. या कादंबरीत सारंगपूर हे मुख्य गाव आहे. या गावाची कथा यात आली आहे. पण सारंगपूर जवळचे पारखेड हे गाव आहे त्या गावाला आग लागते त्याचे वर्णन हुबेहुब वाटते. कुठेही अतिशयोक्ती वाटत नाही. हे उपकथानक मर्यादित असले तरी त्याचा संबंध सारंगपूरशी येतो. जळीत पारखेडला भेट देण्यासाठी आमदार, अधिकारी येतात त्यांना परतीच्या वेळेस सारंगपूरचे लोक अडवितात, पारखेडची जळीत कहाणी अन पुंजाजी जुमडे याची आत्महत्या वाचकांना हलवून टाकते.

६) स्वप्नाचे चित्रण : प्रा.सदानंद देशमुख यांनी राघोजीच्या पडलेल्या स्वप्नाचे चित्रण अतिशय उत्कटरित्या केले आहे. या चित्रणात लेखकाची कल्पकता व भाषाशैली यांचा सुंदर मिलाफ झालेला आहे. एक नमुना पाहु या. कुत्र्याले भिवून आपून पळत घरी येतो. त रामकोर बांळतीन व्हते, तिले व्हते वासरु, उभं राहून थरथर कांपणारं वासरु टरटर वाढते... वावरात जाते. एकीहुन बबन घेरी येतो, दुसरीकून वासरू. आपून वखराले जुपतो, वखर चालू व्हतें, ... वखराले जुपेल बबन म्हणते... पाणी द्या.. वासरू बी बोलते... पाणी द्या... पण त्याह्यले पाजायले पाणीच नसते.... मंग दोघंबी दंगामस्ती करुन. जाळीच्या शिवळा मोडतात. पाण्यासाठी कासरे तोडून रानोमाळ पळाय

लागतात. आपून बी त्याह्यच्या मांग पळतो, त मंधात लागती झहिर. ते दोघं बी पाण्यासाठी इतिरीत उडया मारतात. गायप, झुडूप व्हतात...

**७) पात्राच्या मनातील विचार :** पात्राच्या मनातील विचार लेखकाने अतिशय कल्पकतेने मांडला आहे. एवढेच नव्हे तर बैलाच्या मनातील देखील वाचतांना लेखाच्या शैलीबद्दल कौतुक वाटते. या कादंबरीतील नायक राघोजी शेवाळे यांच्या मनातील विचार अनेकदा कादंबरीत आले आहेत. त्यातला एक नमुना पाहू या. कोणीतरी आपल्याजवळ बसावं. आपल्याशी बोलत रहावं अस खूप वाटायचं अर्थात हे लेखकाचे निवेदन आहे. पण राघोजी जेव्हा स्वःशी मनातल्या मनात बोलतो ते संवाद अतिशय मनाला भिडणारे आहेत. तसं पाह्यलं त ही दुनिया म्हणजे तरी काय हाये ? कचरंच आखरं शेवटी झाडाचं कचरं .. मेल्यावर ढोराच्या हाडकायचं कचरं, जाळल्यावर माणसाच्या राखीचं कचरं... तसचं आपल्या मनात बी वंगाळ वकटया इचारांच कचरं उखंडाचा झाला आपल्या मनाचा.

बैलाच्या मनातलं सुध्दा लेखकाने चित्रित केले आहेत. रत्ना बबनच्या मागे बैलगाडीजवळ आली, मुरल्या आणि छबिल्या तिच्याकडे नवलाने पाहत होते. हा त एकटाच गेला व्हता. अन ही कोण आली याच्यासंग, असा विचार बैलाच्या मनात आला असावा. दुसऱ्या एका प्रसंगात गाडी ओढायच्या वेळेस बैल पुढे चालतचं नव्हते. बबनने काडी उचलली तर बैल कान वर उचलून थोबाड वर करायचे बबन त्याच्या पाठीवर काडी हाणतो तेव्हा बैलांच्या मनातील विचार असा – मार बापा काडया, घे हात दुखोस्तोर मारुन.

**८) मर्यादा :** तहान या कादंबरीचे एक विशेष आहेत. ही कादंबरी लोकप्रिय झालेली आहे.. कादंबरीचे शिर्षक, कथानक, पात्रे, संवाद, वाक्ये, या बाबतीत कादंबरीचे यश ठळकपणे दिसते. कादंबरीतील पात्रांपैकी वर्षा हे पात्र मात्र दुर्लक्षित झाल्यासारखे वाटते. वर्षा ही व्यक्तीरेखा फारशी रंगली नाही. तिच्यावर अन्याय झाल्यासारखा वाटतो. पात्रांच्या भाऊगर्दीत वर्षा जरी हरविलेली दिसते. तिच्या व्यक्तिरेखेला फारसा वाव मिळाला नाही.

कादंबरीतील काही शब्द व काही म्हणींचा अर्थबोध होत नाही. या कादंबरीतील प्रमोद नवले हे पात्र बी.ए.शिकलेला असूनही त्याची भाषा ग्रामीणच वाटते. पोलीस सोमनाथ हावरे, वरठे गुरुजी देखील ग्रामीणच आहे फक्त आमदार याची भाषा प्रमाण भाषा आहे. या थोडया उणीवा असल्या तरी कादंबरीच्या यशात काहीच फरक पडत नाही.

## साहित्यप्रकार – कथा

कथा सांगण्याची आणि ऐकण्याची आवड माणसाच्या मनात फार पुरातन काळापासून रुजलेली आहे. कथा हा शब्द मराठी साहित्यत कथन आणि कथनरुप या दोन्ही अर्थानी वापरला जातो. कथा साहित्यात निवेदक घटनांचे कथन करीत असतो. मराठी साहित्यात कथन आणि कथनरुप या दोन्ही अर्थानी वापरला जातो. समाज जीवनातील एखाद्या अवस्थेचे जीवनानुभवाचे चित्रण शब्दबध्द केलेले असते. कथेतील अनुभव पात्र, प्रसंग आणि भावना यांच्यातील संबंध मर्यादित असतात. कथा ही लहान असते ही वैशिष्ट्ये लक्षात घेऊन वेगवेगळ्या लेखकांनी कथेच्या अनेक व्याख्या केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे १) पुढे काय झाले या विषयी उत्कंठा निर्माण करणाऱ्या धावत्या घटनांचा आधार घेऊन चित्रण होते. २) अर्ध्या तासात वाचून होईल ती लघुकथा ४) कहानी, घटना या चरित्र विशेष कां संक्षिप्त रसयुक्त चित्रण है । ललिताप्रसाद सुकुल ५) कमीतकमी पात्रात प्रसंग वापरुन थोडया वेळात परिणामकारक रितीने सांगितलेली व ऐकणाऱ्या मनावर एकच एक ठसा

उमटविणारी हकीकत म्हणजे लघुकथा होय. ना.सी.फडके. ६) एकात्म अशा कथात्म अनुभवांची अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा – इंदुमती शेवडे ७) नवकथा म्हणजे काही जुन्या कथांच्या वर्तुळाशेजारी काढलेले एक छोटेसे वर्तुळ नव्हे हा मोठया वर्तुळाचा लहानसा भाग आहे. – प्रा.गंगाधर गाडगीळ अशा अनेकविध लेखकांनी कथेच्या अनेकविध व्याख्या केल्या आहेत. त्यावरुन आपणांस कथा म्हणजे काय याची साधारण कल्पना येऊ शकते.

**कविता :**

कविता हा एक मुलभूत साहित्यप्रकार मानला जातो. वास्तवात कवितेची मोठया प्रमाणावर विविध रुपे आढळतात. त्यामुळे कवितेची मुळ प्रकृती आणि ती सिध्द होणारी तिचे मूळ रुप या सर्वांचा विचार प्रथमदर्शनी तरी गोंधळात टाकणारा आहे. कारण त्यामुळे धर्म संस्कृती, कला शास्त्र अशी मानवी व्यवहारांची सर्वच महत्वाची क्षेत्रे प्राचीन कवितेने व्यापून टाकली होती. सामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनात रंजन, बोध, श्रमपरिहार इ.असंख्य हेतूंनी तिचा वापर होत असे. त्यामुळे, स्त्रोत्रे, सूक्ते, भूपाळ्या, गीते, लघुकाव्य, महाकाव्ये, कथा काव्ये, आख्याने इ. भाट शाहीर महाकविंच्या विदग्ध रचनांपासून जात्यावरील ओव्या, म्हणी उखाणे, सणासुदीची गाणी घरगुती वातावरणातील शीघ्र रचनांपर्यंतची अभिव्यक्तीची निर्माण झालेली असंख्यरुपे यांना काव्य या नावानेच ओळखले जात असे.

कविता हा शब्द उच्चारताच वाचकांच्या मनात कवितेची विविध रुपे येतात. कविता या शब्दाची मुख्य व्याख्या देणे कठीण आहे. अनेकांनी काव्याच्या व्याख्या केल्याआहेत. पण कविता म्हणजे काय ? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळेल असे खात्रीने सांगता येत नाही. म्हणूनच कवितेच्या व्याख्येसोबत तिच्या अनुषंगिक गुणधर्माची चर्चा करणे आवश्यक आहे.

पाश्चात्यांच्या आणि आपल्या दोन्ही व्याख्या अपूर्ण वाटतात. या व्याख्या काव्याचे अंग व्यक्त करतात असे समजून सर्व कवितेतील सार तेवढेच महत्वाचे ठरते. कु. या धातूपासून कवी, काव्य, कविता हे शब्द आले आहेत. (शब्दांचा बोध होतो), याचा अर्थ प्रकट करणे, असा होतो.काव्य शब्दांचा सृजनात्मक शक्ती असलेला (नवे निर्माण करणारा) ज्ञानी व्यक्ती असा होतो. काव्याचा आत्म रस आहे असे विश्वनाथने म्हटले आहे. कविता वाचल्यावर वाचकांच्या मनात काही भावनिक अनुभव येतात. वीर, शृंगार, करूण, विनोद, इत्यादी रसांना योग्य अशा भावनांचा तो अनुभव येतो. व त्यांच्या मनाला आल्हाद वाटतो. अशा भावनांचे सुंदर चित्र, मुर्तीमंतपणे डोळ्यासमोर उभे करणे शब्दार्थ म्हणजेच काव्य. कविता हा एक वांडमयप्रकार आहे. गद्य आणि पद्य असे दोन वांडमयाचे प्रकार आहेत, त्यापैकी कवितेचा समावेश पद्यात होतो. भजने, ओव्या, आरत्या, गीते, हया पद्यात आणि पद्य असे दोन वांडमयाचे प्रकार आहेत. त्यापैकी कवितेचा समावेश पद्यात होतो.

कविता म्हणजे काय ? याच्या उत्तरात अनेकांनी अनेक मते नोंदवली आहेत. पण तिची नक्की व्याख्या करता येत नाही. सर्व व्याख्यांमधील अशाच योग्य वाटतो म्हणून थोडक्यात मोजक्या शब्दात सांगावयाचे झाल्यास असे म्हणावेसे वाटते की सर्व अभ्यासकांच्या सर्व व्याख्या म्हणजे कविता होय.

**साहित्यप्रकार**

साहित्य प्रकारालाही जरा मरण असते हे मान्य करायला हवे. कारण बरेचदा साहित्यातही अनेक प्रकार जन्माला येतात. काही दिवस त्यांचे नवेपण टिकते. पुढे तो साहित्य प्रकार लिहिला जात नाही. नाटयछटा

या वांङ्मय प्रकारचे असेच झाले. त्वरेने लोकप्रीय झालेला हा कादंबरीप्रकार आज अंधारात नाहीसा झाल्यासारखा आहे. असे म्हटले तर चूक होणार नाही. त्या संदर्भात कादंबरी वांडमय प्रकाराचे चिरंजीवित्व चटकन लक्षात येते. गेली १४५ वर्षे हा वांडमय प्रकार प्रगतच होत आहे. असे दिसते. त्याचे कारण कादंबरीकारांनी जीवनाची जी नवी नवी क्षेत्रे गुंडाळली त्यात आहे. कांदबरी वांडमय वैविध्य आणण्यात अनेक लेखकांचा सिंहाचा वाटा आहे. ऐतिहासीक, पौराणीक, चरित्रात्मक, वास्तववादी, सामाजिक, अद्भूत, प्रादेशिक, संज्ञाप्रवाही इत्यादी अनेक नवे स्वरुप प्रकार कादंबरीकारांनी हाताळले. त्यामुळेच कादंबरीचे स्वरुप नित्यनूतन राहत आले आहे.

कांदबरीला वेगळे वळण लागले ते वा. म. जोशी यांच्या रागिणीमुळे, घटनाप्रधान अथवा व्यक्तिप्रधान कांदबरीला मनोरचनेचे अधिक पाठबळ मिळाले. या कालखंडात केतकर, नाथ माधव, हडप, खांडेकर, गुर्जर, फडके, रांगणेकर, माडखोलकर, यांच्याबरोबर शिरुरकर, निरंतर, पु.ल.देशपांडे, गो.चि.भाटे, के.रा.पुरोहित, कुमिदनी प्रभावळखर, शांता नाशिककर, इत्यादी कादंबरीकार प्रसिध्दीस आले. यानंतर सामान्यतः १९३५ ते १९६० या कालखंडात कांदबरीच्या क्षेत्रात काहीतरी नवीन करु पाहणाऱ्या लेखकांचा एक वर्ग्र पुढे आला. संज्ञाप्रवाही कादंबऱ्याची लाट मध्येच येऊन गेली. त्यात १९३९ मध्ये प्रसिध्द झालेल्या विश्राम बेड्केर यांची रणांगण, व १९४० मध्ये प्रसिध्द झालेली बी.सी.मर्ढेकर यांची रात्रीचा दिवस, या कादंबऱ्यांनी मराठी वांडमयात फार मोठा बदल घडवून आणला. या संज्ञाप्रवाहाने कादंबरीकाराला नाविन्य आणि लेखनस्वातंत्र्य दोन्ही मिळाले. याच काळात विकृतीतून भावविश्लेषण करु पाहणारा एक वर्ग उदयाला आला. श्री.पु.वा.भावे (वर्षाव) श्री.पु.ल.देशपांडे (नवे जग) श्री.बिलविलकर (शुभा) इत्यांदीचा उल्लेख या संदर्भात करता येईल.

आज मराठी वांडमयातून उपरोक्त ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, प्रादेशिक इत्यादी कांदबरी वांङ्मयाचे प्रकार हाताळले जात आहेत. त्यात पुष्कळ नावीन्य आणण्याचा प्रयत्न होत आहे. मनोविकृतीपासून समसंभोगापर्यतची वर्णने करणाऱ्या कादंबऱ्या प्रसिध्द होत आहेत. कधी त्यांचे समर्थन केले जाते तर कधी त्यावर टिका केली जाते. भाऊ पाध्ये, खानोलकर इत्यादी लेखकांनी अनुक्रमे वासुनाना, रात्रकाळी, घागर काळी, इत्यादी सारख्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. फडके, खांडेकर, पु.भा.भावे, माडखोलकर, प्रा.गाडगीळ, प्रा.भालचंद्र नेमाडे इद्यादी नव्या जुन्या कादबंरीकारांनी नवीन प्रकार हाताळून मोलाची भर घातली. प्रारंभी लहानसा प्रवाह असलेल्या या कादंबरी वांडमयाने महानदीचे स्वरुप घेतले. या कादंबरीचा संक्षिप्त इतिहासपट आपल्याला या वांडमय प्रकाराची विशालता व भव्यता लक्षात यावी या हेतूने दिला आहे.

## बी.ए.तृतिय वर्ष

## सत्र सहावे

## गरुडझेप – भरत आंधळे

खडतर सामाजिक आणि कौटूंबिक परिस्थिती नशिबी आल्यानंतरही अविरत संघर्ष करत यु.पी.एस.सी. परिक्षेत यशस्वी ठरलेले भरत आंधळे म्हणजे स्पर्धा परिक्षा देणाऱ्यांचे ऑयडॉलच जणू. आयुष्याच्या पंखाना चिवट जिद्दीचे बळ देत आंधळे यांनी सिन्नर तालुक्यातल्या ठाणगांव मधून थेट सहाय्यक आयकर आयुक्तापर्यंत घेतलेली भरारी त्यांनी गरुडझेप एक ध्येयवेडा प्रवास या पुस्तकातून शब्दबध्द केलेला आहे.

एका छोटया गावातून साध्या नोकरीच्या आशेने नाशिकला आलेल्या आंधळे यांच्या मनात स्पर्धा परिक्षेचे आणि त्यातही युपीएसी बीज कसे रुजले. याची झलक 'गरुडझेप' या पुस्तकात भरत आंधळे यांनी कथित केले आहे. नाशिकला गेल्यानंतर जीवनाच्या संघर्षमय प्रवासात खऱ्या अर्थाने मी पोहोचलो तेव्हा राहण्याचा प्रश्न निर्माण झाला. राहण्याच्या भाडयाची पंचायत तिथे जेवायला काय करायचे हाही प्रश्न होताच. अशातच आयटीआय सुरु झाला. दिवस जाऊ लागले. शनिवारी रविवार आयटीआय ला सुट्टी असायची. विस रुपये रोजाने मी दोन दिवस कामाला जायचो. कसा तरी निर्वाह चालू होता. परीक्षा संपताच शैलजा पॅकेजींग नावाच्या एका कंपनीत काम मिळाले. ऑगष्टच्या पहिल्या आठवडयात आयटीआयचा निकाल लागला. पास झालो. नाशिकच्या सातपूर औद्योगिक वसाहतीत हिंदुस्थान फास्टनर नावाच्या कंपनीत बाराशे रुपये महिन्याचे काम मिळाले. हया कंपनीतील बिट्टू नावाच्या मुलाने माझ्या चुका सुधारुन बऱ्याच गोष्टी शिकविल्या.

या सर्व परिस्थितीत संजय पाटील याच्या सल्याने मी बाहेरुन पदवीचे शिक्षण घेत राहिलो. पदवीच्या पहिल्या वर्षी मला दोन विषयात एटीकेटी लागली. सोबत नोकरी चालूच होती. अशा दोन्ही आघाडया सांभाळत मी पदवीची परीक्षा दिली. आणि १९९९ मध्ये माझ्या घरातला पहिला ग्रॅज्युएट मुलगा झालो. एका रविवारी संजय पाटील नाशिकला प्रशिक्षण केन्द्रात नेले. तेथे त्यांचा आतेभाऊ संजय झिंगे पी.एस.आयचे प्रशिक्षण घेत होता. पीएसआय होण्यासाठी काय करावे लागते याची चौकशी केली. झिंगेने मला पंधरावी शिक्षण आणि तीव्र अभ्यासाची इच्छा या गोष्टी आवश्यक असल्याचे सांगितले. पंधरावी तर मी पास होतोच. ऑगष्ट १९९९ मध्ये कंपनी सोडून अभ्यासाचा निर्णय घेतला. वय २१ वर्षे झाले होते. मी पीएसआय चा अभ्यास सुरु करतोय म्हटल्यावर बऱ्याच जणांनी मी वेडा झालो आहे असे विचार व्यक्त केले . सकाळी सात पासून तर एक पर्यंत अभ्यास आणि नंतर दवाखान्यात काम असा प्रयोग एक वर्षभर केला. अशातच स्पर्धा परिक्षा नावाच्या एका मासिकात जयकर लायब्ररीची माहिती मिळाली. मी आपली बॅग भरली बसमध्ये बसलो. आणि पुण्याकडे निघालो जयकर लायब्ररीत मला सिन्नरचा प्रशांत वाघ नावाचा मुलगा भेटला. त्याने मला माझ्या खोलीत राहायला ये असे सांगीतले. विद्यापीठातच मला 'कमवा आणि शिका' नावाच्या योजनेची माहिती मिळाली. मी एम.ए.इतिहासला ॲडमिशन घेतली. पीएसआय व्हायचे एवढे एकच ध्येय ठेवून समोर मेहनत चालू ठेवली. २००३ मध्ये एम.ए.झालो. ५३ टक्के मिळाले. याच वर्षी पीएसआय पूर्व आणि मुख्य परीक्षा पास झालो. दरम्यान अजित जोशी नावाच्या मुलाची युपीएससी. मधून निवड झाली होती. त्याने मला युपीएससी परीक्षा देण्याचा सल्ला दिला. २००४ मध्ये पीएसआय

पदी अंतिम निवड झाली परंतु अजितचा सल्ला डोक्यातून जात नव्हता. एक स्वप्न पूर्ण झाले होते. दुसरे खुणावत होते. अशा वेळी निर्णय घेणे अवघडच होते. पंरतु धाडस करायचे ठरवले. आणि पी.एस.आय. ला रामराम ठोकून युपीएसची चा रस्ता धरला.

अशा तऱ्हेने 'गरुडझेप एक ध्येयवेडा प्रवास' या आत्मचरित्रात भरत आंधळेनी घेतलेली भरारी शब्दबध्द केलेली आहे.

एका छोटया गावातून साध्या नोकरीच्या आशेने नाशिकला आलेल्या आंधळे यांच्या मनात स्पर्धा परिक्षेचे आणि त्यातही युपीएसी बीज कसे रुजले याची झलक गरुडझेप या पुस्तकात भरत आंधळे यांनी कथित केले आहे. नाशिकला गेल्यानंतर जीवनाच्या संघर्षमय प्रवासात खऱ्या अर्थाने मी पोहोचलो तेव्हा राहण्याचा प्रश्न निर्माण झाला. राहण्याच्या भाडयाची पंचायत तिथे जेवायला काय करायचे हाही प्रश्न होताच. अशातच आयटीआय सुरु झाला. दिवस जाऊ लागले. शनिवारी रविवार आयटीआय ला सुट्टी असायची. विस रुपये रोजाने मी दोन दिवस कामाला जायचो. कसा तरी निर्वाह चालू होता. परीक्षा संपताच शैलजा पॅकेजींग नावाच्या एका कंपनीत काम मिळाले. ऑगष्टच्या पहिल्या आठवडयात आयटीआयचा निकाल लागला. पास झालो. नाशिकच्या सातपूर औद्योगिक वसाहतीत हिंदुस्थान फास्टनर नावाच्या कंपनीत बाराशे रुपये महिन्याचे काम मिळाले. हया कंपनीतील बिट्टू नावाच्या मुलाने माझ्या चुका सुधारुन बऱ्याच गोष्टी शिकविल्या.

या सर्व परिस्थितीत संजय पाटील याच्या सल्याने मी बाहेरुन पदवीचे शिक्षण घेत राहीलो. पदवीच्या पहिल्या वर्षी मला दोन विषयात एटीकेटी लागली. सोबत नोकरी चालूच होती. अशा दोन्ही आघाडया सांभाळत मी पदवीची परीक्षा दिली. आणि १९९९ मध्ये माझ्या घरातला पहिला ग्रॅज्युएट मुलगा झालो. एका रविवारी संजय पाटील नाशिकला प्रशिक्षण केन्द्रात नेले. तेथे त्यांचा आतेभाऊ संजय झिंगे पी.एस.आयचे प्रशिक्षण घेत होता. पीएसआय होण्यासाठी काय करावे लागते याची चौकशी केली. झिंगेने मला पंधरावी शिक्षण आणि त्रीव्र अभ्यासाची इच्छा या गोष्टी आवश्यक असल्याचे सांगितले. पंधरावी तर मी पास होतोच. ऑगष्ट १९९९ मध्ये कंपनी सोडून अभ्यासाचा निर्णय घेतला. वय २१ वर्षे झाले होते. मी पीएसआय चा अभ्यास सुरु करतोय म्हटल्यावर बऱ्याच जणांनी मी वेडा झालो आहे असे विचार व्यक्त केले . सकाळी सात पासून तर एक पर्यंत अभ्यास आणि नंतर दवाखान्यात काम असा प्रयोग एक वर्षभर केला. अशातच स्पर्धा परिक्षा नावाच्या एका मासिकात जयकर लायब्ररीची माहिती मिळाली. मी आपली बॅग भरली बसमध्ये बसलो. आणि पुण्याकडे निघालो जयकर लायब्ररीत मला सिन्नरचा प्रशांत वाघ नावाचा मुलगा भेटला. त्याने मला माझ्या खोलीत राहायला ये असे सांगीतले. विद्यापीठातच 'मला कमवा आणि शिका' नावाच्या योजनेची माहिती मिळाली. मी एम.ए.इतिहासला ॲडमिशन घेतली. पीएसआय व्हायचे एवढे एकच ध्येय ठेवून समोर मेहनच चालू ठेवली. २००३ मध्ये एम.ए.झालो. ५३ टक्के मिळाले. याच वर्षी पीएसआय पूर्व आणि मुख्य परीक्षा पास झालो. दरम्यान अजित जोशी नावाच्या मुलाची युपीएससी. मधून निवड झाली होती. त्याने मला युपीएससी परिक्षा देण्याचा सल्ला दिला. २००४ मध्ये पीएसआय पदी अंतिम निवड झाली परंतु अजितचा सल्ला डोक्यातून जात नव्हता. एक स्वप्न पुर्ण झाले होते. दुसरे खुणावत

होते. अशा वेळी निर्णय घेणे अवघडच होते. पंरतु धाडस करायचे ठरवले. आणि पीएसआय ला रामराम ठोकून युपीएसची चा रस्ता धरला.

अशा तऱ्हेने 'गरुडझेप एक ध्येयवेडा प्रवास' या आत्मचरित्रात भरत आंधळेनी घेतलेली भरारी शब्दबध्द केलेली आहे.

## प्रमाणभाषा आणि बोली : परस्पर संबंध

१) बोली ही प्रमाणभोषशी साधर्म्याप्रमाणेच वैधर्म्यही दर्शवित असते. अहिराणीत प्रमाण मराठीप्रमाणेच ईण च्या तऱ्हेनेच ईन लागुन पुल्लिंगाचे स्त्रिलिंग होत से, पाटील–पाटलीन, परंतु अंडोरे (मुलगा)चे स्त्रीलींग मात्र अंडेर होते.
२) प्रमाणभाषा ही प्रायः केन्द्रस्थानी असते. त्यामुळे दोन दूरस्थ वा सीमेवरील बोलींना ती जवळची असते. उदा. हळवी, आणि कुडाळी–मालवणी यांना प्रमाणबोली ही एक प्रकारे समान तऱ्हेची वाटते.
३) एखाद्या स्थानिक बोलीच्या आकलनक्षेत्राहून प्रमाणभाषेचे आकलनक्षेत्र अधिक विस्तृत असते. याविषयीची चर्चा प्रमाणभाषेच्या संदर्भात झालेलीच आहे.
४) प्रमाणभाषा ही लिपीबध्द असते., उलटपक्षी बहुतेक बोलींना लिपी नसते. गोमंतकी कोकणीला पूर्वी लिपी नव्हती. ख्रिस्ती धर्मोपदशेकांनी सोळाव्या शतकाच्या मध्यास तिला रोपमन लिपी विशिष्ट गरजेनुसार दिली. लिपीबध्दतेमुळे बोलीपेक्षा प्रमाणभाषेत व्यक्तीसापेक्ष साम्यभेदांचे प्रघात कमी प्रमाणात आढळून येतात. लिपिबध्दतेमुळे प्रमाणभाषेला अभिव्यक्तीचा विशिष्ट स्तरावरील ठरीवपणा प्राप्त होतो. त्यामुळे तिला औपचारिकता आणि कृत्रीमता येत असते.
५) एका प्रमाणभाषेच्या वर्तुळकक्षेत अनेक स्थानिक बोलींचा समावेश होतो. तिला एक केद्रवर्ती क्षेत्र संक्रमण प्रसारण क्षेत्र आणि सिमा क्षेत्र असते. प्रसारमाध्यमांमुळे तिचे क्षेत्र अधिकाधिक विस्तारत असते. बोलींचा कधी कधी इतका संकोच होतो की, त्या नष्टप्रायही होतात. उदा. चित्पावनी बोली.
६) प्रमाणभाषेच्या सीमाक्षेत्रावरील बोलीत भाषामिश्रण आढळते. त्यातून द्वैभाषिक समस्या उद्‌भवतात, बेळगांव, कारबारबाबत कन्नाडिगांशी तसेच डांगीबाबत गुजरात्यांशी असणारे आपले मतभेद सर्वश्रूतच आहे.
७) बोली बोलणाऱ्यांचा सांस्कृतिक दर्जा आणि महत्वाकांक्षा बोलीला प्रमाणभाषेच्या योग्यतेस पोहचवू शकते. यादव कालपूर्वी बोली रुपाने असणाऱ्या मराठी यादवांची राजवट आणि ज्ञानेश्वरादिकांचे वाग्वैभव यामुळे प्रमाणभाषेचा दर्जा प्राप्त झाला. तद्वतच गोव्याच्या सासष्ट देशातील सारस्वतांमुळे नागरी लिपीयुक्त गोमतंकी–कोकणीला प्रमाणभाषेचे रुप येऊ पाहत आहे.
८) प्रमाणभाषेतून लुप्त झालेले जुने शब्द किंवा व्याकरणिक रुप बोलीच्या वर्तमान स्वरुपात जशीच्या तशी राहिलेली आढळून येतात. गोमंतकी कोकणीने यादवकालीन मराठी रुपे कशी जपून ठेवली आहेत. हे प्रियोंळकरांनी उत्तम प्रकारे दाखवून दिलेले आहे.

### १) वऱ्हाडी :

या बोलीचे क्षेत्र बरेच विस्तीर्ण आहे. बुलढाण्याच्या मध्यातून उत्तरेस या बोलीची सीमा थेट तापी नदीपर्यंत

पोहचते. तेथून पुर्वेकडे एलिचपूर, बैतुल, छिंदवाडा, शिवणी, बालाघाट, यांचा दक्षिण भाग ती आपल्या कक्षात घेते. नतंर भंडारा, चंद्रपूर वायव्य भाग, वणी, वाशिम या प्रदेशाला वेढून परत बुलढाण्यापर्यंत पोहोचते. वऱ्हाडी बोली प्राचीन असल्याचा दावा मांडण्यात आलेला आहे. लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र, यासारख्या आद्य महानुभाव ग्रंथाच्या भाषेशी तिचे असणारे नाते दर्शवून डॉ.सु.म.डोळके यांनी म्हटले आहे – सारांश, वऱ्हाडी ही एकीकडून अशंतः प्राचीन व आद्य मराठी तर दुसरीकडून आधुनिक मराठीपासून व व्याकरणमान्यतेपासून दूर असलेली अशी महाराष्ट्रातील प्रमुख बोली आहे.

**नागपूरी :**

नागपूरी बोलीच्या क्षेत्राचे थोडक्यात वर्णन करावयाचे तर वर्धा आणि वैनगंगा या नद्यांच्या दुआबाचा प्रदेश असे करता येईल. नागपूर, वर्धा हे जिल्हे चंद्रपूर आणि भंडारा जिल्हयांचा पश्चिम भाग, छिंदवाडायाचा सौसंर तहसिल व बालाघाटचा नैऋत्यभाग यांचा नागपूरीच्या क्षेत्रात अंतर्भाव होतो.

**हळबी :**

महाराष्ट्रातील चंद्रपूर (चांदा) भंडारा, तसेच, एलिचपूरचा टापू, आणि मध्यप्रदेशातील बस्तर, कांकेर, रायपूर या भागात हळबी बोली प्रचलित आहे. ती बोलणारे हळब लोक हे मुळचे अनार्य असावेत, व त्यांनी आर्यसंस्कृती तसेच आर्यांची भाषा यांचा स्वीकार केलेला असावा, हळबी बोलीत मराठी,छत्तीसगडी हिंदी आणि उरिया या भाषांचे मिश्रण आढळते. मी देखलो नाही सारखे वाक्य पाहावे यात देख हा शब्द हिंदी असला तरी एकूण प्रत्यय प्रक्रिया मराठी धर्तीची आहे. शब्दसंग्रहापेक्षा व्याकरनिक रुपसिध्दीचा विचार केल्यास हळबीला हिंदीची बोली मानन्यापेक्षा मराठीची बोली मानन्याकडे कल होतो.

**अहिराणी :**

अहिराणीला खानदेशी असेही संबोधिले आहे. अहिराणी हे नाव ती ज्या लोकांची बोली आहे त्या अभिर–अहिर लोकांवरुन पडेल आहे. तर दुसरे खानदेशी हे नाव तिच्या मुख्य भाषिक क्षेत्रावरुन दिले गेले आहे. या बोलीचे क्षेत्र बऱ्हाणपूर धुळे, जळगांव, हे जिल्हे, नाशिक जिल्हांचा उत्तर भाग व तेथून थेट नेमाड बुलढाण्यापर्यंत पोहोचते. बागलाणी आणि नंदुरबारी असे तिचे पोटभेदही मानले जातात.

ग्रियर्सन लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया या ग्रंथाच्या नवव्या खंडाच्या तिसऱ्या भागात खानदेशी च्या संदर्भात म्हटले आहे. या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्ये खानदेशी च्या संदर्भात म्हटले आहे. या प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्ये खानदेशी म्हणून एक बोली आहे. तिचे वर्गीकरण आजवर मराठी एक रुप या नात्याने केले जात असते. कथित भिल्ली बोली या खानदेशीत हळूहळू सरमिसळ होत जातात. उलटपक्षी खुद्द खानदेशी ही मराठीची बोलीच नाही हे पुढील पानांवरुन ध्यानात येईल. अनेक परसर्ग आणि प्रत्यय मराठीशी एकरु होणारे आहेत. हे खरे असले तरी इतर परसर्ग व प्रत्यय व सदर बोलीभाषेचे आंतरिक रुप गुजराथी आणि राजस्थानी भाषांशी मिळते जुळते आहे.

**डांगी :**

महाराष्ट्र आणि गुजरात यांचे द्वैभाषिक राज्य मोडून ती. स १९६० मध्ये स्वतंत्र राज्ये झाली. त्या काळी डांग हा सुमारे ६५० चौ,मैलाचा दाट जंगलाचा प्रदेश गुजरात राज्यात समाविष्ट करण्यात आला. दांग (अरण्य) या पदावरुन या प्रदेशाचे आणि त्यांच्या बोलीचे नाव पडलेले असावे. ग्रियर्सन यांनी डांगी ही अहिराणीशी मिळतीजुळती आणि खुद्द अहिराणी गुजरातीची पोटभाषा मानली जाते. हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. डांगची प्रमुख बोली भिल्ली आहे तिचा सविस्तर अभ्यास डॉ.सु.बा.कुळकर्णी यांनी भिल्ली ऑफ डांगज् (१९७६) या पुस्तकात मांडला आहे. त्यांच्या आधारेच आपण डांगी बोलीचा परिचय करुन घेणार आहोत.

**कोकणी :**

सह्याद्रीच्या पर्वतामुळे पश्चिम महाराष्ट्राचे देश आणि कोकण असे दोन भाग पडतात. सह्यांद्रीला पश्चिमेस अरबी समुद्रापर्यंत दमणपासून– गोवा कोचीनपर्यंत किनारपट्टी आहे. तिला कोकण संबोधतात. आणि त्या पट्टीतील बोलींना ठोसपणे कोकणी म्हणून संबोधतात. पण ग्रिर्यसन यांच्या भाषिक पाहणीनुसार तिसाहुन अधिक बोली कोकणी ठरवाव्या लागतील. तरीपण सामान्यपणे दमणपासून रत्नागिरीपर्यंत उत्तर कोकणी, तर राजापूर ते गोवा कारवारपर्यंत दक्षिणी कोकणी अशी दोन स्वरुपे ठळकपणे जाणवतात. पण आपणांस गोमंतकी कोकणी या बोलीचीच माहिती करुन घ्यावयाची आहे. कारण ही कोकणी मराठीची बोली आहे की स्वतंत्र भाषा आहे हा प्रश्न मोठा वादग्रस्त होऊन बसलेला आहे. वा.र.बालावलीकर बांदावल (१९४९) व फॉर्मेशन ऑफ कोकणी (१९४२) या आपल्या ग्रंथात कोकणी ही स्वतंत्र भाषा आहे असा दावा केलेला असून प्रा.अ.का.प्रियोळकर यांनी ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली (१९६६) या आपल्या ग्रंथात त्या मताचे खंडन केलेले आहे.